# समर्थन राज्य मानवी हक्क वार्ता पुरस्कार - २०१६

## माहितीपत्रक

- **'समर्थन राज्य मानवी हक्क वार्ता पुरस्कार'चे स्वरुप: रुपये ५,०००/-, प्रशस्तिपत्र व मानचिन्ह.**
- **वृत्तपत्र व दृक-श्राव्य वाहिन्यांतील पत्रकारांसाठी ४ राज्यस्तरीय पुरस्कार**
- **उत्तेजनार्थ पुरस्कार (प्रशस्तिपत्र व मानचिन्ह )**
- **प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख : १५ जुलै २०१७**

- **पुरस्कारासाठी पात्रता :**

➢ मुंबई व पुणे ही दोन शहरे वगळता, उर्वरीत महाराष्ट्रातील पत्रकार, वार्ताहर किंवा मुक्त-पत्रकार (ही अट चित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींना शिथिल केली आहे.)

➢ वंचित समाज घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी, खाली नमूद केलेल्या किंवा अन्य मानवी हक्क विषयांवर बातम्या, लेख लिहून त्यांचा पाठपुरावा केला असेल असे पत्रकार ❍ दलित, आदिवासी, भटके, विमुक्त, महिला, बालके, अपंग, बालमजूर, असंघटीत क्षेत्रातील मजूर यांचे आर्थिक व सामाजिक प्रश्न,❍पोलिसी अत्याचाराचे बळी, ❍शिक्षण व आरोग्य, ❍जमीन विषयक प्रश्न, ❍ शेतकऱ्यांचे प्रश्न, ❍ आपत्तीग्रस्त व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, ❍कुपोषण, ❍पर्यावरण, ❍कामगार प्रश्न.

- **प्रवेशिका दाखल करताना पुढील बाबींची काटेकोरपणे पूर्तता करावी:**

– १) संपूर्ण नाव, २) संपूर्ण पत्ता, ३) दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, ४) इ-मेल, ५) वर्तमानपत्र/चित्रवाहिनीचे नाव, कार्यालयाचा पत्ता व जबाबदारी/पद, ६) शिक्षण, ७) वय, ८) पत्रकारिता क्षेत्रातील अनुभव (वर्षे), ९) या क्षेत्राशी संबंधित पुरस्कार मिळाले असल्यास त्याची माहिती, १०) विशेष उल्लेखनीय कामगिरी या बाबींचा उल्लेख असावा] व सोबत पासपोर्ट साईजचे कृष्ण-धवल २ फोटो.

– वरील विषयांवर १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ या कालावधीत प्रकाशित, तारखांचा उल्लेख असलेल्या लेखांची/बातम्यांची ८ ते १० कात्रणे आणि चित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींसाठी संबंधित बातम्यांच्या ***दोन सीडीज*** पाठवाव्यात. सोबत चित्रित बातम्यांचा थोडक्यात सारांश लिखित स्वरुपात पाठवावा.

– **एखाद्या बातमी सोबत पत्रकाराचे नाव नसल्यास ती बातमी संबंधित पत्रकारानेच लिहिली असल्याबाबतचे संपादकांचे पत्र जोडावे.**

– दृक-श्राव्य माध्यमातील प्रतिनिधींकडे चित्रफीत उपलब्ध नसल्यास, 'पुरस्काराकरिता प्रवेशिका पाठवित असल्याचे व वाहिनीने सदर चित्रफीत उपलब्ध करून देण्याची विनंती' करणारे पत्र वाहिनीच्या प्रमुखांना पाठवावे व त्याची एक छायांकित प्रत प्रवेशिकेसोबत जोडावी.

– कृपया मान्यवरांची शिफारस पत्रे, वाचकांची प्रतिक्रिया वा तत्सम सदरात केलेले लिखाण पाठवू नये.

– **या पुरस्काराने सन्मानित पत्रकारांनी कृपया पुन्हा प्रवेशिका पाठवू नयेत.**

- **मान्यवर पत्रकारांच्या निवड समितीमार्फत विजेत्यांची निवड होईल. 'समर्थन' त्यात कोणताही हस्तक्षेप करीत नाही.**


**अर्ज पाठविण्यासाठी व अधिक माहिती मिळविण्यासाठी संपर्क:**

**समर्थन**, ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशनजवळ, वसई (पू), जि. पालघर -४०१२०७

दूरध्वनी:०२५०-२३९०१०३/२३९०१०४

✉ samarthanmumbai97@gmail.com ❍ website : www.samarthanadvocacy.org

भ्रमणध्वनी: ९८६९७१९२७७